| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २७४ वा | गुरूवार दिनांक १५ जानेवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

वाशी(प्रतिनिधी)- ठाणे अंतर्गत उमाकांत रा.तोंडार ता. उदगीर जि. लातुर हे पारगाव टोलनाक्याचे पुढे काही अंतरावर हॉटेल सरकार येथे अंदाजे २,३७० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १२ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### धाराशिव पोलिसांची जुगार विरोधी कारवाई

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान भुम पोलीसांनी दि.१३.०१.२०२६ रोजी भुम पो ठाणे हद्दीत बसस्थानकच्या बाजूचे टपरी मध्ये छापा टाकला. यावेळी दत्ता रा. कल्याणनगर भुम ता. भुम जि. धाराशिव हे १७.३६ वा. सु.बसस्थानकच्या बाजूचे टपरी मध्ये कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण १,०५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले भुम पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### डंपरसह वाळूची चोरी: गुन्हा दाखल

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत रणवीर शेषेराव साळुंके, वय ३३ वर्षे, रा. सातेफळ ता. केज जि. बीड यांनी दि.११.०१.२०२६ रोजी मांडवा शिवारात वाशी रोडवरील पुला जवळ डंपर क्र एमएच ०४ बीयु १७८५ मध्ये तीन ब्रास वाळु ९,००० किंमतीची डंपर सह २,०९,००० किंमतीचे चोरी करुन घेवून जात असताना मिळून आला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गणेश अंकुश खैरे, नेमणुक पोलीस ठाणे वाशी यांनी दि.१३.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२)अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### १३ नोझल २० पाईपची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- तुळसाबाई चंद्रकांत खराटे, वय ५० वर्षे, रा.भोगजी ता. कळंब जि. धाराशिव यांचे भोगजी शिवारातील शेत गट नं २७३ मधील जैन कंपनीचे स्प्रिंकलरचे १३ नोझल २० पाईप असा एकुण २०,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने दि.०९.०१.२०२६ रोजी १६.०० ते दि. १०.०१.२०२६ रोजी १०.०० वा. सु. चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- तुळसाबाई खराटे यांनी दि.१३.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## कळंबमध्ये सेवापूर्ती गुणगौरव सोहळा; सैन्यशिस्त व बलिदानाचा गौरव!

### ब्रिगेडिअर सुमंत दशरथ व ले.कर्नल भिमराव पवार यांचा भव्य सत्कार




कळंब (प्रतिनिधी)- देशसेवेतील प्रदीर्घ व गौरवशाली कार्याचा सन्मान करणारा सेवापूर्ती गुणगौरव सोहळा कळंब तालुक्यात सोमवारी, दि. १२ जानेवारी रोजी अत्यंत भावनिक व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. भारतीय थलसेनेतील सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी ब्रिगेडिअर (निवृत्त) सुमंत दशरथ (मराठा लाईट इन्फंट्री) व लेफ्टनंट कर्नल (निवृत्त) भिमराव शिवाजी पवार (आर्मी एज्युकेशन कोअर) यांचा या वेळी सन्मान करण्यात आला. हा सोहळा कळंब माजीसैनिक, वीरमाता, वीरपत्नी, एनसीसी ग्रुप व माजीसैनिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने तहसील कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. तालुक्यातील शेकडो माजीसैनिक गणवेषात उपस्थित राहिल्याने सभागृहात सैनिकी शिस्त, अभिमान व देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे, तहसीलदार हेमंत ढोकळे, गटविकास अधिकारी सोपान अकोले तसेच जिल्हा सैनिक कार्यालय, धाराशिवचे जी.ए. कुलकर्णी यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे यांनी आपल्या भाषणात, सैनिक म्हणजे शिस्त, अनुशासन, प्रामाणिकपणा, त्याग आणि बलिदान यांचे मूर्तिमंत उदाहरण आहे. माजीसैनिकांच्या सन्मानासाठी प्रशासन नेहमीच कटिबद्ध आहे, असे स्पष्ट केले.

तहसीलदार हेमंत ढोकळे यांनी माजीसैनिकांच्या प्रश्नांवर तत्परतेने न्याय देण्याची ग्वाही देत अमर जवान स्मारकासाठी आवश्यक असलेली जागा चर्चेतून मार्गी लावण्याचे ठोस आश्वासन दिले. सैनिकांचा सन्मान राखून सेवा देणे हे प्रशासनाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

गटविकास अधिकारी सोपान अकोले यांनी देशभक्तीपर गीत सादर करून सभागृहात ऊर्जा व उत्साह निर्माण केला.

सत्कारमूर्ती ब्रिगेडिअर (निवृत्त) सुमंत दशरथ यांनी आपल्या मनोगतात, माझ्या यशाचे श्रेय आई-वडील आणि माझ्या ज्युनियर सहकाऱ्यांना जाते. अधिकारी म्हणून काम करताना माझा ज्युनियर सुखी असेल, तरच मी सुखी असतो, या तत्वावर मी कार्य केले, असे सांगितले. अमर जवान स्मारक पुढील पिढीसाठी प्रेरणास्थान ठरणार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. लेफ्टनंट कर्नल (निवृत्त) भिमराव पवार यांनी सामान्य सैनिकापासून अधिकारी पदापर्यंतचा आपला प्रवास उलगडून दाखवत माजीसैनिकांना शासकीय नोंदी, पेन्शन व विविध प्रक्रियांबाबत उपयुक्त मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. भारत माता की जय च्या घोषात हा गौरवसोहळा यशस्वीरीत्या संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार एस. के. पुरी यांनी मानले

## कळंब नगरपरिषदेत ठाकरे गटाचा झेंडा बुलंद!

### सौ. सफुरा शकील काझी यांची गटनेतेपदी निवड



कळंब (प्रतिनिधी)- कळंब नगरपरिषदेत उद्धव बाळासाहेब ठाकरे नेतृत्वाखालील शिवसेनेने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली आहे. ठाकरे गटाच्या नगरसेवकांनी एकमुखी निर्णय घेत सौ. सफुरा शकील काझी यांची कळंब नगरपरिषदेच्या गटनेतेपदी निवड केली. या निवडीमुळे कळंबच्या राजकारणात खळबळ उडाली असून विरोधकांच्या गोटात अस्वस्थता पसरली आहे.

सामान्य जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका, प्रशासनाला जाब विचारण्याची ठाम भूमिका आणि नगरविकासाच्या मुद्द्यावर निर्भीड मते मांडणाऱ्या सौ. काझी यांच्या नेतृत्वाखाली आता ठाकरे गट अधिक आक्रमकपणे मैदानात उतरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. ही निवड म्हणजे केवळ पदाची नव्हे, तर कळंबच्या राजकारणात ठाकरे गटाच्या नव्या आक्रमक पर्वाची सुरुवात असल्याचे बोलले जात आहे.

या निवडीमुळे येणाऱ्या काळात नगरपरिषदेत जनतेच्या प्रश्नांवर संघर्ष तीव्र होणार असून, भ्रष्टाचार, विकासातील दिरंगाई आणि प्रशासनाच्या हलगर्जीपणाविरोधात ठाकरे गट निर्णायक भूमिका घेणार, असा इशाराही यानिमित्ताने देण्यात आला आहे.

सौ. सफुरा शकील काझी यांच्या गटनेतेपदी निवडीचे शहरभर स्वागत होत असून, ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. कळंब नगरपरिषदेत आता 'लढाई ठरलेली आहे' आणि नेतृत्व सौ. काझी यांच्या हाती आहे, हे मात्र नक्की.या निवडीबद्दल त्यांचा कार्यालयात आमदार कैलास पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला याप्रसंगी पॅनेल प्रमुख संजय मुंदडा, रश्मी मुंदडा , सचिन काळे ,नगरसेवक ज्योती हारकर , जमील खाटीक, इंदुमती हौसलमल, अशा भवर ,सागर मुंडे, वन मला वाघमारे, मोसीन मिर्झा, रुकसाना बागवान या वेळी उपस्थित होते .

## जळकोट येथील श्री केदारलिंगेश्वर मंदिराच्या सभागृहाचे भूमिपूजन



तुळजापूर (प्रतिनिधी)- तालुक्यातील जळकोट येथील ग्रामदैवत श्री केदालिंगेश्वर मंदिर सभागृहाचे भूमिपूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या सभागृहास तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणाजगजीत सिंह पाटील साहेब यांच्या कडून मंदिर सभा मंडपासाठी २५ लक्ष रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे या कार्यक्रमाच्या सर्वप्रथम श्री केदारलिंगेश्वरास व तसेच जगतज्योती श्री महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. व भूमिपूजन सोहळा मोठ्या थाटा माठात संपन्न झाला. आमदार पाटील साहेब यांनी दिलेल्या निधीमुळे मंदिराच्या विकास कामांमध्ये भर पडली आहे. त्यामुळे सर्व भक्त गणातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या कार्यक्रमास यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा सोनटक्के, भाजपाचे विलास राठोड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आशिष दादा सोनटक्के, केदारलिंगेश्वर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बाबुराव पटणे, भीमाशंकर नळगे, नारायण पटणे, नागनाथ मेंगशेट्टी, राम किलजे, सुभाष पाटील, बसवराज कवठे, अनिल छत्रे, तमन्नाप्पा माळगे, बाळासाहेब पाटील, नागनाथ किलजे, पत्रकार अरुण लोखंडे, पत्रकार विजय पिसे, कल्याणी साखरे, औसेकर सर ,संजय अंगुले, हनुमंत अंगुले, संजय माने, संतोष वाघमारे,प्रसाद हतै, सदाशिव हासुरे, अभिजीत कवठे, सागर राजमाने, सचिन माळगे, अर्जुन यादगौडा, रामशेट्टी पाटील, लक्ष्मीकांत पाटील, चंद्रकांत माळगे, रेवण दरेकर, विशाल साखरे, श्रीशैल नागठाण, प्रवीण नरुणे, तम्मा कुंभार, अनिल मडोळे, परमेश्वर मडोळे , काशिनाथ पटणे, तुकाराम कुंभार, प्रवीण मेंगशेट्टी,मंगेश सुरवसे, शिवराज आलूरे, बसवराज छत्रे, शिवराज कलशेट्टी,अमोल आलुरे, बालाजी पालमपलै, विवेक पिसे, वैभव स्वामी, अविनाश डांगे, अक्षय साखरे, कृष्णा घोडके, आधी गावातील केदारलिंग भक्त व गावातील समाज बांधव तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजमाता जिजाऊ यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- शहरामध्ये राजमाता जिजाऊ यांची जयंती विविध सामाजिक उपक्रम राबववून मोठ्या उत्साहात दि.१२ जानेवारी रोजी साजरा करण्यात आली. सकाळपासूनच जिजाऊ चौकात जिजाऊ प्रेमींनी जिजाऊंना अभिवादन करण्यासाठी गर्दी केली होती. जिजाऊ उत्सव पारंपारिक पद्धतीने मात्र मोठ्या जल्लोषात साजरा केल्याने संपूर्ण परिसर जिजाऊंच्या जयघोष यांनी दणाणून गेला होता.

धाराशिव येथील जिजाऊ चौकामध्ये मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समिती अध्यक्ष प्रणिता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख मान्यवरांच्या हस्ते जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार राणाजगजीतसिंह पाटील, नगराध्यक्ष नेहा काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. तर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक आणि विविध संस्थांनी भाग घेऊन जिजाऊंच्या विचारांना अभिवादन केले.

या उत्सवांमध्ये जिजाऊंच्या कार्याचा गौरव करण्यात आला आणि त्यांच्या विचारांवर आधारित सामाजिक उपक्रम राबवले गेले. यामध्ये रक्तदान आणि वृक्षारोपण याचा समावेश आहे. जिजाऊ चौकात जिजाऊंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. तर मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समितीच्यावतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे आज जन्मलेल्या मुलींना कपडे व मातांना साडी चोळी आदींचे वाटप करण्यात आले. तसेच नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेविका यांचा सत्कार करण्यात आला. तर विद्यार्थ्यांनी वेशभूषा काढून शोभायात्रा व वाहन रॅली काढण्यात आली. या कार्यक्रमास जिजाऊ प्रेमी, शिवप्रेमी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## येणेगूर शिवारातील शेतरस्त्याच्या वादावर महसूलने काढला मार्ग



येणेगूर (प्रतिनिधी)- उमरगा तालुक्यातील येणेगूर ग्रामपंचायतच्या कार्यक्षेत्रात शेतरस्ता संदर्भात शेतकऱ्यांचा वाद होता गेली वर्ष अडचणीत असलेल्या रस्त्याचा प्रश्न महसूल विभागाच्या वतीने सर्व शेतकऱ्यांच्या सहमतीने मार्गी लागला आहे.

येथे जवळपास सहा गटाच्या बांधावरून जाणाऱ्या अंदाजे एक किलोमीटर रस्त्यावरून बऱ्याच वर्षापासून शेतकऱ्यांचा वाद होता. याशिवाय रस्ता अडवल्यामुळे शेतात वहिवाट करतानाही गैरसोय होत होती.

यासंदर्भात उमरगा तहसील कार्यालयात प्रकरण चालू होते. नायब तहसीलदार भीमाशंकर बेरुळे यांनी दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन स्थळ पाहणी केली. दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांना मुख्यमंत्री शेत रस्ते पाणंद रस्त्यासंबंधी मार्गदर्शन व समुपदेशन करून पंचासमक्ष सर्वांच्या संमतीने १२ फूट रुंद अंदाजे एक किलोमीटर अंतराचा रस्ता वहिवाटीसाठी खुला करून दिला.

या वेळी दाळिंब मंडल अधिकारी एम. के. यामूलवाड, उपसरपंच बाबासाहेब गायकवाड, ग्राम महसूल अधिकारी रंजना राठोड, भूमी अभिलेखचे पोलिस पाटील शिवदर्शन पाटील, विश्वनाथ गुंजोटे आदींच्या सहकार्याने प्रश्न मिटला.

## मानवी हक्क अभियानाच्या लढ्याला यश

### जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनानंतर कारखानदारांकडून २३ लाखांची मदत,ऊसतोड कामगार कुटुंबाला दिलासा

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्ह्यातील मौ. डोंगरवाडी येथील ऊसतोड कामगार गणेश डोंगरे यांच्या अपघाती मृत्यूनंतर प्रशासन आणि साखर कारखान्यांकडून सुरुवातीला दुर्लक्ष होत असताना, मानवी हक्क अभियानाने आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकारी धाराशिव यांना दिलेल्या निवेदनामुळेच अखेर या प्रकरणाला गती मिळाली. संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे संबंधित यश साखर कारखान्याकडून मृत कामगाराच्या कुटुंबाला २३ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली असून हा संपूर्ण न्यायसंघर्षाचा विजय मानवी हक्क अभियानालाच श्रेयस्कर असल्याचे बोलले जात आहे. कामाच्या ठिकाणी झालेल्या अपघातात गणेश डोंगरे यांचा मृत्यू झाल्यानंतर पत्नी व तीन लहान मुलांचे भवितव्य अंधारात गेले होते. शासन, प्रशासन आणि साखर कारखाने गप्प असताना मानवी हक्क अभियानाने पुढाकार घेत जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले. मृत कामगाराच्या कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी शासन व कारखान्यांनी घ्यावी, तसेच किमान ५० लाख रुपयांची मदत द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली होती. या निवेदनानंतरच संबंधित यश साखर कारखान्याला हालचाल करावी लागली. संघटनेच्या दबावामुळे १९ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला, तसेच ऊसतोड कामगार महेश याने घेतलेली ४ लाख रुपयांची उचल पूर्णतः माफ करण्यात आली. त्यामुळे एकूण २३ लाख रुपयांची मदत कुटुंबाला मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. मानवी हक्क अभियानाने ही मदत प्राथमिक असल्याचे सांगत मृत कामगाराच्या कुटुंबाला पूर्ण न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, अशी भूमिका घेतली आहे. संघटना नसती तर हे प्रकरण दडपले गेले असते, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत असून, या यशाचे सर्व श्रेय मानवी हक्क अभियानाच्या लढाऊ भूमिकेलाव प्रशासनावर टाकलेल्या दबावालाचजाते, असे स्पष्ट मत व्यक्त होत आहे. या निवेदनावर मानवी हक्क अभियानाचे जिल्हाध्यक्ष कैलास पवार, जिल्हा सचिव माहन ताटे, समन्वयक अरुणकुमार माने, सय्यद रझाक, सुग्रीव कांबळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## मतदानाचा हक्क बजावलाच पाहिजे

कोणतीही का निवडणुक असो मतदान केले पाहिजे. कोणीही मतदानापासून वंचित राहाणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. गुरूवार हा महानगरपालिकामध्ये नगरसेवक निवडण्याचा म्हणजे मतदानाचा दिवस आहे. आपल्या वार्डातील, प्रभागातील प्रतिनिधी निवडूण देण्याचा हा दिवस आहे. आपले नगरसेवक हे पाच वर्षासाठी निवडायाचे असतात. पाच वर्ष त्यांच्याकडून कामे करून घ्यावयाचे असतात. त्यामुळे आपल्या पसंतीचा व आपल्या वार्डात काम करणारा प्रतिनिधी निवडण्याची ही संधी आली आहे. त्यामुळे निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. मतदान केले पाहिजे. लोकशाहीत हा अधिकार गाजविला पाहिजे. आपल्या देशात लोकशाही आहे त्यामुळे आपल्या ईच्छेनुसार प्रतिनिधी निवडले जातात. इतर देशात हुकूमशाही असल्याने कोणताही अधिकार नसतो. बोलण्याचा, लिहीण्याचा किंवा भाषणाचा म्हणजे लोकशाही विरुद्ध असते. भारत स्वतंत्र झाल्यापासून लोकशाहीत वावरत आहोत, ती आपण स्विकारली आहे. त्यामुळे लोकशाहीतील आपले कर्तव्य बजावले पाहिजेत. त्यामुळे गुरूवारी पहिले काम हे मतदान करणे आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. मतदानाचा हक्क बजाविल्यानंतर इतर कामास सुरवात केली पाहिजे. जनतच्या ईच्छेचे लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी सरकार मोठ्या प्रमाणात खर्च करीत असतो. जनतेला आपल्या मनातील उमेदवार निवडावा म्हणून जे प्रयत्न केले आहेत त्याचा लाभ घेतला पहिजे. मुळात दरपाच वर्षांनी आपल्या देशात निवडणुका होतात. लोकसभापासून ते ग्रामपंचायत पर्यंत लोकशाहीने मार्गाने आपले प्रतिनिधी निवडत असतो. ते निवडले पाहिजेत. काही झाले तरी आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. हे पहिल्यांदा लक्षात ठेवले पाहिजे. मतदान करणे म्हणजे आपल्याला पसंतीचा उमेदवार, आपण निवडणे हा आहे. आपल्या मतदार संघात झालेली कामा पेक्षा इतर अधिक कामे करणारा असा उमेदवार निवडला पाहिजे. मुळात आपण मतदान नाही केले तर आपल्याला टिका करण्याचा, बोलण्याचा अधिकार नाही हे लक्षात घेतले पाहिजे. लोकशाहीत मतदान करण्याची मोठी संधी आहे. ती चुकू नये. मुळात लोकशाहीत अनेक अधिकार प्राप्त झाले आहेत. आपण आपलाच प्रतिनिधी निवडला तर कामे होतील. समस्या सोडविल्या जातील. अनेक भाग हा विकासापासून वंचित आहे. अनेक भागात मुलभूत सुविधाचा अभाव आहे. अशा ठिकाणी आपण जर योग्य प्रतिनिधी निवडला तर आपल्या भागाचा विकास जोमाने होईल. समस्या नष्ट होतील. समस्या म्हणजे वेळेवर पाणी, रस्ते, स्वच्छता अशी साधी कामे असतात तरी ते करणारा प्रतिनिधी आवश्यक असावा लागतो. तो निवडला पाहिजे. ती संधी चुकविता कामा नये. वास्तविक दिर्घ काळानंतर महानगरपालिकेची निवडणुक होत आहे. नवु वर्षापुर्वी नगरसेवक निवडले होते. त्यांची मुदत संपली तरी निवडणुक झाली नाही. त्यामुळे आपल्या प्रभागातील महत्वाची कामे प्रलंबित आहेत. अशी प्रलंबित असणारी कामे होण्यासाठी आपणास जो योग्य वाटतो त्याची निवड केली पाहिजे. आपण मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. त्याशिवाय निवांत बसू नये. पाच वर्षांनी संधी येते. पश्चाताप भोगण्यापेक्षा आपल्याला पसंतीचा, कामे करणारा नगरसेवक निवडला पाहिजे. तरच कामे होतील. नसता आपल्या हातून चुक झाली व आपण मतदानापासून वंचित राहीले तर नुकसान आपलेच आहे. अनेकदा चुकीची निवड झाली तर पाच वर्ष पश्चाताप होतो का नाही? त्यामुळे आलेली लोकशाहीची संधीचा लाभ घेतला पाहिजे. मतदान आपण करावे. घराच्यांना करावयास सांगावे, आपल्या आजूबाजूस असणारी मंडळी, मित्र परिणार यांना मतदान करण्यास भाग पाडले पाहिजे. लोकशाहीचा हा उत्सव आहे. लोकशाहीनुसार दिलेला अधिकार बजावत आहोत. कोणीही आडविणार नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण आपल्यासाठी, आपल्या प्रभागासाठी निवड करणार आहोत. निकाल मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी कळणार आहे. त्यामुळे आपण महानगरपालिकेच्या निवडणुकीत मतदान करावे लागणार आहे. ते विसरता कामा नये. मुळात आपल्या देशात सर्वांची निवड ही लोकशाही मार्गाने होते. सर्वांची निवड मताधिकारातून होते. ही बाब लक्षात घेतली पाहिजे. त्यामुळे मतदानापासून कोणी वंचित राहू नये यासाठी जागृत राहीले पाहिजे. लोकशाही दृढ व्हावी यासाठी मोठ्या प्रमाणात सरकार खर्च करीत आहे. मतदान व निकाला दिवशी किती यंत्रणा कामाला लावली जाते. त्यांचा खर्च अधिक आहे. त्याची व्यवस्थेवर खर्च अधिक आहे. तो पैसा हा आपल्याच कर रूपाने दिलेल्या निधीतून होतो. सर्व काही आपल्यासाठी सरकार करते. आपल्याला केवळ मतदान करावयाचे आहे. याला फार वेळ लागत नाही. घराजवळ मतदान केंद्राची उभारणी केलेली असते. दूर काही जाण्याची गरज नाही. वेळ काढून मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. त्यामुळे गुरुवारी पहिले काम हे मतदानाचे आहे. हे लक्षात ठेवले पाहिजे. मताची टक्केवारी कमी होते. ते योग्य नाही. मतदानाची टक्केवारी वाढली पाहिजे. मतदान न करणारी मंडळीस काही तरी दंडात्मक कारवाईची करण्याचा विचार आगामी काळात झाला पाहिजे. आजारी किंवा अशक्य बाब असेल तर मतदानास जावू शकत नाही. मोठी आडचण असेल तर ठिक! मात्र किमान नव्वद टक्क्यापर्यंत मतदान झाले पाहिजे. मतदान कमी का होते किंवा मतदान साठ-सत्तर टक्के मतदान होत असेल तर बाकीचे का होत नाही यावर चिंतन झाले पाहिजे. महानगरपालिकेच्या माध्यमातून नगरसेवक निवडूण द्यावयाचे असतात. आपल्याच भागातील घराशेजारील प्रतिनिधी असल्याने कोणतेही काम त्यांना सांगून करण्यात येवू शकतात. नगरसेवकांची जबाबदारी सुद्धा असते की, आपणासा मत दिल्याने नगरसेवक पद मिळाले आहे. त्यानुसार ते काम करतात. मतदार नागरिकांना केवळ वेळ काढून मतदान करावयाचे आहे ते केले पाहिजे. कोणीही मतदानापासून वंचित राहू नये. लोकशाही वृद्धींगत करण्याचे काम आहे. लोकशाहीत वावरत असताना मतदान केले पाहिजे. ते केले पाहिजे.

# सेवेतून भक्तीचा मार्ग

### 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या शहीदी समागम कार्यक्रमात सेवेच्या माध्यमातून साक्षीदार होवू या

भारतीय इतिहासात धर्म, मानवता, त्याग आणि बलिदान यांचे अद्वितीय प्रतीक म्हणून श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांचे नाव अजरामर आहे. धर्मस्वातंत्र्य, मानवमूल्ये आणि सत्यासाठी प्राणार्पण करणारे ते ''हिंद-दी-चादर'' म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या महान शहिदीच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड शहरात २४ व २५ जानेवारी रोजी एक भव्य, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हा भव्य समागम असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुमारे ५३ एकर विस्तीर्ण मैदानावर संपन्न होणार असून, देश-विदेशातून जवळपास १० लाखांहून अधिक भाविक या पवित्र समागम कार्यक्रमासाठी नांदेडमध्ये दाखल होणार आहेत. हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता आणि मानवतेचा महासंगम ठरणार आहे.

**नऊ समाजांचा ऐतिहासिक सहभाग**

या ऐतिहासिक शहीदी समागमाचे आयोजन नऊ समाजांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

राज्य शासनाचा अल्पसंख्याक विभाग, ''हिंद-दी-चादर'' श्री गुरु तेगबहादूर साहिबजी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच सीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज या सर्व समाजांनी एकत्र येत एकतेचा आणि समतेचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

ही संयुक्त रचना स्वतःच गुरूंच्या विचारांची जिवंत साक्ष आहे. ''सर्व धर्म समान, सर्व मानव समान'' हा संदेश या आयोजनातून ठळकपणे अधोरेखित होतो.

**मुख्य मंडप, अनवाणी चालण्याची परंपरा आणि श्रद्धेचा सन्मान**

कार्यक्रम स्थळी उभारण्यात येणाऱ्या मुख्य मंडपात दोनही दिवस श्री गुरु ग्रंथसाहिब विराजमान राहणार आहे. गुरूंच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी येणारे सर्व भाविक, मान्यवर, पदाधिकारी व अतिथी कार्यक्रम स्थळी अनवाणी चालणार आहेत.

ही परंपरा केवळ धार्मिक शिस्त नसून अहंकार त्याग, नम्रता आणि गुरूचरणी समर्पणाची भावना व्यक्त करणारी आहे. लाखो भाविक अनवाणी चालत गुरूंच्या दर्शनासाठी येणार, हे दृश्यच सेवेतून भक्तीचा खरा अर्थ उलगडून दाखवणारे ठरणार आहे. तसेच संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या जन्म गाव नरसी नामदेव येथून वारकरी दिंड्या पायी चालत नांदेड येथे समागम स्थळी येणार आहे

**श्रमदानातून उभी राहणारी सेवा संस्कृती**




या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा एक अत्यंत प्रेरणादायी प्रसंग म्हणजे नुकतेच पार पडलेले भव्य श्रमदान. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या उपस्थितीत कार्यक्रम स्थळी श्रमदान करण्यात आले. मैदानावरील खडे उचलणे, जमिनीची स्वच्छता करणे, चालण्यासाठी सुरक्षित व्यवस्था करणे ही सर्व कामे सेवाभावाने करण्यात आली.

प्रशासन, विद्यार्थी,स्वयंसेवक आणि भाविकांनी एकत्र येऊन केलेले हे श्रमदान सेवेतून भक्तीचा प्रत्यक्ष अनुभव देणारे ठरले. गुरूंच्या शिकवणीनुसार सेवा हीच खरी साधना असल्याचा संदेश या उपक्रमातून समाजापर्यंत पोहोचला.

**लंगर : समानतेचा आणि मानवतेचा महासागर**

या भव्य शहीदी समागमात भाविकांच्या सोयीसाठी १२ भव्य लंगर उभारण्यात येणार आहेत. प्रत्येक लंगरमध्ये एकावेळी सुमारे ३,००० भाविक बसून भोजन करू शकतील, अशी उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे.

२४ व २५ जानेवारी रोजी हे लंगर सकाळी ८ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत अखंड सुरू राहणार आहेत.

लंगर म्हणजे केवळ अन्नसेवा नाही, तर समानतेची शिकवण आहे. येथे जात, धर्म, भाषा, देश, श्रीमंती-गरिबी यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वजण एकाच पंक्तीत बसून गुरूचा प्रसाद स्वीकारणार आहेत. हा दृश्य अनुभव गुरू नानक देवजींच्या ''सर्व मानव समान आहेत'' या विचाराचा साक्षात्कार घडवणारा असेल.

**विनामूल्य सेवा स्टॉल**

कार्यक्रम स्थळाच्या चारही बाजूंनी दोन किलोमीटरपर्यंतच्या परिसरात चहा, पाणी, नाश्ता, फळे यांचे विनामूल्य सेवा स्टॉल उभारण्यात येणार आहेत.

ही व्यवस्था लाखो भाविकांच्या सोयीसाठी असून, निःस्वार्थ सेवेचा सर्वोच्च आदर्श समाजासमोर ठेवणारी आहे. सेवा करताना कोणताही मोबदला, मान-सन्मान किंवा प्रसिद्धी अपेक्षित नसून, केवळ गुरूंच्या नावाने सेवा करण्याचा आनंद स्वयंसेवक अनुभवणार आहेत.

**जुताघर : नम्रतेचा आणि अहंकारत्यागाचा संस्कार**

कार्यक्रम स्थळी ८ प्रवेशद्वारांवर ८ जुताघरे उभारण्यात येणार असून, गरजेनुसार त्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे. लाखो भाविकांच्या पादत्राणांची काळजी घेणे ही एक मोठी जबाबदारी असून, ती सेवा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडली जाणार आहे.

जुताघर सेवा म्हणजे अहंकाराचा त्याग आणि नम्रतेची साधना. गुरूंच्या दरबारात प्रवेश करताना पादत्राणे बाहेर ठेवणे म्हणजे बाह्य वैभव आणि गर्व दारातच ठेवणे होय. ही सेवा माणसाला अंतर्मुख करते आणि समानतेचा खरा अर्थ शिकवते.

**गतका, परंपरा आणि शौर्याचे दर्शन**

या शहीदी समागमात शीख धर्मीयांचा पारंपरिक युद्धकला प्रकार 'गतका' सादर करण्यात येणार आहे. यामध्ये पारंपरिक शस्त्रांचे प्रदर्शन, शौर्य, शिस्त आणि युद्धकलेचे प्रात्यक्षिक पाहायला मिळणार आहे.

तसेच नऊ समाजांच्या वतीने पारंपरिक कीर्तन, कथा आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यातून गुरूंच्या जीवनकार्याचा आणि बलिदानाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे.

या सामगमासाठी दिल्ली अमृतसर, चंदीगड, मुंबई, हैद्राबाद येथून मोफत रेल्वे सेवा राहणार असून तसेच विशेष विमानसेवा दोन्ही दिवस असणार आहे. तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी दहा हजार भाविकांच्या निवासासाठी सर्व सुविधायुक्त आदर्श टेन्ट सिटी उभी करण्यात येणार आहेत

**हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी : श्रद्धेचा अभिषेक**

या ऐतिहासिक कार्यक्रमात हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. गुरूंच्या प्रतिकृतीवर आणि भाविकांवर होणारी ही पुष्पवृष्टी म्हणजे श्रद्धेचा, सन्मानाचा आणि कृतज्ञतेचा अभिषेक असेल.

**सेवेतून इतिहासाचे साक्षीदार होवू या**

नांदेड येथे होणारा हा ३५० वा शहीदी समागम म्हणजे केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता, बलिदान आणि मानवतेचा महासोहळा आहे. ''हिंद-दी-चादर'' श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांचा संदेश आजही तितकाच जिवंत असून, तो या भव्य आयोजनातून संपूर्ण जगाला पुन्हा एकदा दिशा देणार आहे. तसेच या कार्यक्रमासाठी विविध राज्यांचे मुख्यमंत्री, बागेश्वरचे आचार्य , महंत आदी उपस्थित राहणार आहे

चला तर मग,या गौरवशाली ऐतिहासिक कार्यक्रमाचे साक्षीदार बनूया,सेवेत सहभागी होऊया आणि गुरूंच्या चरणी आपली सेवा अर्पण करण्यासाठी सज्ज होऊया.

**– अलका पाटील**
**उपसंपादक**
**जिमाका,नांदेड**

# डायबिटीससाठी सुपरफूड आहेत 'हे' पदार्थ, नियमित खाल्ल्यास अजिबात वाढणार नाही शुगर

अलीकडे चुकीची जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींमुळे, मधुमेहाच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. मधुमेह पूर्णपणे बरा करणे शक्य नाही, परंतु जीवनशैलीत काही बदल करून तुम्ही तो निश्चितपणे नियंत्रित करू शकता. आज आम्ही तुम्हाला अशा काही पदार्थांबाबत सांगणार आहोत जे मधुमेह रोखण्यास मदत करू शकतात..

मेथी–

डायबिटीसमध्ये मेथीच्या बिया आणि भाजीचे सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होण्यास मदत होते. शिवाय, जर मधुमेही रुग्ण नियमितपणे मेथीचे पाणी पित असेल तर ते टाइप २ मधुमेह नियंत्रित करण्यास मदत करते. मेथीमध्ये गॅलेक्टोमनन देखील असते. जे रक्तातील साखरेचे शोषण कमी करते.

पालक–

पालक हा आरोग्यासाठी एक वरदान उपाय आहे. पालकामध्ये आरोग्यासाठी फायदेशीर असलेले मॅग्नेशियम, लोह आणि फायबर भरपूर प्रमाणात असते. या हिरव्या भाजीतील हे पोषक घटक मधुमेह नियंत्रित करण्यास मदत करतात. म्हणून, मधुमेही त्यांच्या आहारात पालकाचा समावेश करू शकतात.

बीट–

काही अभ्यासानुसार बीट हे इन्सुलिन उत्पादनाचा एक चांगला स्रोत मानले जाते. बीटमध्ये आढळणारे निओ-बेटानिन सारखे पोषक घटक रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यास आणि इन्सुलिनचे उत्पादन वाढविण्यास मदत करतात. याव्यतिरिक्त, फायटोकेमिकल्सने समृद्ध बीट, इन्सुलिन वाढवताना साखर पचवण्यास अत्यंत उपयुक्त असतात.

बदाम–

बदाम मोनोअनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिड, प्रथिने आणि फायबरने समृद्ध असतात. यामुळे रक्तातील साखर नियंत्रित होण्यास मदत होते. बदाम खाल्ल्याने इन्सुलिनचे उत्पादन सुधारते. त्यामुळे मधुमेहींनी नियमितपणे योग्य प्रमाणात बदाम खावेत.

चिया सीड्स–

चिया सीड्समध्ये मायरिसेटिन नावाचे कॅफिक ॲसिड असते. जे मधुमेहाच्या धोक्याशी लढण्यासाठी प्रभावी मानले जाते. चिया सीड्समध्ये अनेक पोषक तत्वे आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात. मधुमेहासह अनेक रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ते फायदेशीर मानले जातात.

# रोज रात्री झोपताना प्या हळदीचे दूध, फायदे जाणून वाटेल आश्चर्य



हिवाळ्यात बहुतेकदा थंडी, आळस आणि विविध आरोग्य समस्या उद्भवतात. म्हणूनच, शरीर उबदार ठेवण्यासाठी आणि आजार टाळण्यासाठी योग्य आहार आणि निरोगी जीवनशैली पाळणे अत्यंत महत्वाचे आहे. हिवाळ्यात आजार रोखण्यासाठी रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करणे सर्वात महत्वाचे आहे.

म्हणूनच, अनेक लोक निरोगी राहण्यासाठी हळदीचे दूध पितात. हळदीचे दूध आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. झोपण्यापूर्वी हळदीचे दूध पिल्याने अनेक आरोग्य फायदे मिळू शकतात. आज आपण हिवाळ्यात झोपण्यापूर्वी हळदीचे दूध पिण्याचे फायदे जाणून घेऊया.

रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते

हिवाळ्यात सर्दी, खोकला आणि विषाणूजन्य संसर्ग सामान्य असतात. हळदीच्या दुधाचे अँटिऑक्सिडंट, अँटीव्हायरल आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. हळदीमध्ये कर्क्यूमिन असते. जे जळजळ कमी करते आणि विषाणूंशी लढण्यास मदत करते. झोपण्यापूर्वी कोमट हळदीचे दूध पिल्याने शरीर आतून उबदार होते आणि संसर्गाचा धोका कमी होतो.

सांध्यांच्या वेदना कमी होतात

थंडीच्या काळात सांधेदुखी, सांधे आकडने आणि वेदना सामान्य असतात.विशेषतः वृद्ध आणि संधिवात असलेल्यांमध्ये हे दिसून येते. हळदीमध्ये नैसर्गिक अँटी इंफ्लीमेंट्री गुणधर्म असतात जे शरीरातील वेदना, सूज आणि कडकपणा कमी करतात. हळदीचे दूध पिल्याने रक्त प्रवाह सुधारतो. ज्यामुळे स्नायू उबदार होतात आणि वेदनांपासून आराम मिळतो.

चांगल्या झोपेसाठी फायदेशीर

हिवाळ्यात, दिवस अनेकदा लहान होतात, ज्यामुळे झोपेचे चक्र विस्कळीत होते. हळदीचे दूध पिल्याने झोप सुधारू शकते. दुधात ट्रिप्टोफॅन नावाचे अमिनो आम्ल असते. जे सेरोटोनिन आणि मेलाटोनिन सारखे झोप आणणारे हार्मोन्स वाढवते. हळदी टाकून कोमट दूध पिल्याने शरीराला आराम मिळतो. ताण कमी होतो आणि चांगली झोप येते.

ग्लोइंग त्वचा

हिवाळ्यात त्वचा कोरडी, निस्तेज आणि खडबडीत होऊ शकते. हळदीचे अँटीऑक्सिडंट आणि अँटीसेप्टिक गुणधर्म त्वचेला आतून पोषण देतात आणि संसर्गाचा धोका कमी करतात. हळदीचे दूध पिल्याने रक्त शुद्ध होते, ज्यामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते. हळदीचे दूध शरीरात ओलावा टिकवून ठेवते, ज्यामुळे तुमची त्वचा मऊ आणि चमकदार राहते.

# आजारांशी दोन हात करते लाल-पिवळ फळ, पावसात खाल तर ताकदवर व्हाल



पावसाळा सुरु झाला की अनेक प्रकारच्या आजारांचा सीझन सुरु होतो. मात्र, या दिवसांत आहारा-विहाराची नीट काळजी घेतली तर मात्र पावसाळ्यात आजारपणं येत नाहीत आणि सीझन छान एंजॉय करता येतो. या मोसमात काही उत्तम फळं मिळतात. ती खाल्ल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. त्यापैकी एक फळ म्हणजे प्लम. यालाच आलुबुखार असंही म्हणतात.

आलुबुखार हे फळ म्हणजे पोषक घटकांचा उत्तम स्रोत आहे. हे फळ अवघ्या काही महिन्यांसाठी बाजारात येते मात्र त्या काळात त्याचे केलेले सेवन तुम्हाला संपूर्ण पावसाळाभर पुरेल एवढी ऊर्जा देते. काही आजारांवर उपचारांमध्येही या फळाचा वापर करतात. हेल्दलाईनच्या रिपोर्टनुसार आलुबुखारमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असते. त्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. त्यात अनेक चांगली अँटिऑक्सिडंट्सही असतात. त्यामुळे कितीतरी गंभीर आजारांचा धोका कमी होतो. सुकी आलुबुखारही चवीला चांगली लागतात. त्यांचाही आपल्या तब्येतीसाठी उपयोग होतो. आलुबुखारमुळे पेशींचं नुकसान नियंत्रणात राहातं. अपायकारक रॅडिकल्सचा प्रभाव कमी करण्यास त्यांचा उपयोग होतो. या फळाच्या नियमित सेवनामुळे शरीरावरील सूज कमी होते. त्यामुळे अनेक तक्रारी आपोआप नियंत्रणात येतात.

या फळांमध्ये भरपूर फायबर्स असल्यामुळे कॉन्स्टिपेशनचा त्रास कमी होतो. ज्यांना पोटाचे त्रास आहेत, पोट साफ होत नाही असं वाटतं त्यांनी आलुबुखार जरुर खावे. चवीला गोड असले तरी आलुबुखार मधुमेहींसाठीही उपयुक्त ठरतात. त्यातील फायबर्स ब्लड शुगरची पातळी योग्य ठेवायला मदत करतात. मात्र, मधुमेहींनी त्याचे सेवन योग्य प्रमाणात करणे आवश्यक आहे. आलुबुखारमुळे हाडांचे आरोग्य सुधारते. हाडे मजबूत होतात. त्यामुळे ऑस्टियोपोरॉसिससारखे त्रास कमी होऊ शकतात. हाडांची झीज थांबण्यासही त्यांची मदत होते. हाय ब्लड प्रेशर आणि कोलेस्ट्रॉल असलेल्या रुग्णांसाठी हे फळ अत्यंत गुणकारी आहे. या दोन्ही त्रासांवर आलुबुखार सेवनाने नियंत्रण येते. रक्तवाहिन्यांसंबंधी आजार होण्याचा धोका कमी होतो. हृदयाचं आरोग्य चांगले राहाते. व्हिटॅमिन्स, मिनरल्स, फासबर्स भरपूर असल्यामुळे निरोगी व्यसनापींसाठीही हे फळ खाणं उपयुक्त ठरते. फिटनेसबाबत जागरुक असलेल्या व्यक्तींनी आलुबुखार बाजारात असताना त्यांचे सेवन जरुर करावं. अलीकडच्या काळात त्या-त्या मोसमात मिळणारी फळे आणि अन्नपदार्थ खाण्याचा सल्ला आहारतज्ज्ञ देतात. त्याबरोबरच थोडी काळजी घेतली तर प्रत्येक ऋतुत तुम्ही निरोगी राहू शकता.

# हिवाळ्यात नियमित खा मूग डाळ, आरोग्याला मिळतील अफाट फायदे



हिवाळ्यात, हिरव्या भाज्यांसोबत डाळींचा आहारात समावेश करणे महत्वाचे आहे. हिवाळ्यात मूग डाळ खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात. मूग डाळ पोषक तत्वांनी समृद्ध असते.ज्यामध्ये प्रथिने, फायबर, सोडियम, पोटॅशियम, लोह आणि व्हिटॅमिन सी असते. मूग डाळ विविध प्रकारे खाल्ली जाऊ शकते. ज्यामध्ये मूग डाळीची चाट, मोड आणलेली मूग डाळ आणि भाज्यांमध्ये घालून खाता येते.

ही डाळ चवीला स्वादिष्ट तर असतेच आणि हिवाळ्यात शरीराला उबदार ठेवते. ती खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि हिवाळ्यात पचनाच्या समस्या कमी होण्यास मदत होते. मूग डाळ खाल्ल्याने सर्दी, खोकला आणि फ्लू टाळण्यास मदत होते. ती पचायला सोपी आहे. ज्यामुळे मुलांपासून वृद्धांपर्यंत घरातील सर्वांना, देणे सोपे होते. चला जाणून घेऊया याचे फायदे..

**रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते–**

हिवाळ्यात अनेकांना रक्तातील साखरेची पातळी वाढते. मूग डाळ खाल्ल्याने मधुमेह नियंत्रित होण्यास मदत होते. मूग डाळीचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो. त्यात फायबर देखील भरपूर असते, जे रक्तप्रवाहात साखरेचे शोषण कमी करण्यास मदत करते.

**हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर–**

मूग डाळ हा फायबर आणि पोटॅशियमचा चांगला स्रोत आहे. जे हृदयाच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे. फायबर कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करते.तर पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. मूग डाळीमध्ये चरबी आणि सोडियम देखील कमी असते.जे दीर्घकालीन हृदयाच्या आरोग्यासाठी योगदान देते.

**वजन कमी करण्यास फायदेशीर–**

जर तुम्ही या हिवाळ्यात वजन कमी करण्याचा विचार करत असाल, तर तुमच्या आहारात मूग डाळीचा समावेश नक्की करा. मूग डाळीमधील प्रथिने आणि फायबर वजन कमी करण्यास मदत करू शकतात. प्रथिने स्नायू तयार करण्यास मदत करतात.तर फायबर तुम्हाला जास्त काळ पोट भरलेले ठेवते. मूगमध्ये कॅलरीज देखील कमी असतात.जे वजन कमी करण्यास मदत करते.

**रोगप्रतिकारशक्ती मजबूत करते–**

हिवाळ्यात मूग डाळ खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. त्यात असलेले झिंक आणि लोह हंगामी संसर्गापासून संरक्षण करते. झिंक पांढऱ्या रक्त पेशी तयार करण्यास मदत करते, जे संसर्गाशी लढतात. लोह ऑक्सिजन वाहून नेण्यास मदत करते, त्यामुळे हंगामी संसर्गापासून संरक्षण होते.

# डुप्लीकेट सोन्याच्या बिस्किटांच्या आधारे नागरिकांची फसवणूक करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश

## स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई ०५ आरोपी अटकेत. ०९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधीः** लातूर जिल्ह्यात नागरिकांची फसवणूक करून खरे सोन्याचे दागिने व रोख रक्कम हडप करणाऱ्या एका अत्यंत संघटित व चलाख टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण, नियोजनबद्ध व धाडसी कारवाईत पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एकूण ०५ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून टोळीचा मुख्य सूत्रधार संदीप हा फरार आहे. आरोपींकडून सुमारे ९,०१,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलिसाकडून सजलेली अधिक माहिती अशी की, मागील काही काळापासून ही टोळी डुप्लीकेट सोन्याचे बिस्कीट, अंगठ्या व इतर दागिने तयार करून त्यांचा वापर ''खरे सोने'' असल्याचा आभास निर्माण करत सामान्य नागरिकांची फसवणूक करीत होती. विशेषतः महिला, वृद्ध नागरिक व एकटे प्रवास करणारे लोक यांना लक्ष्य करून ही टोळी अत्यंत चलाखीने आपला गुन्हेगारी उद्योग चालवत होती. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी नमूद प्रकारच्या टोळीचा शोध घेऊन कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन करून सूचना केल्या होत्या.



त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक लातूर जिल्ह्यात डुबलीकेट सोने देऊन फसवणूक करणाऱ्या आरोपींचा अनेक दिवसापासून शोध वेगवेगळ्या मार्गाने माहिती संकलित करून विश्लेषण करण्यात येत होते. दरम्यान विशेष पथकाला दिनांक १३ जानेवारी रोजी गरुड चौक, लातूर परिसरात गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, गरुड चौक ते राजीव गांधी चौक रिंग रोडवरील सिंकंदरपूर जाणाऱ्या रस्त्यावर एक टाटा इंडीगो कार व एक होंडा एक्टिवा स्कूटीसह काही इसम डुप्लीकेट सोन्याचे बिस्कीट विक्री करून फसवणूक करण्यासाठी थांबले आहेत.

माहितीची खात्री होताच पथकाने सायंकाळी ५.०० वाजता सापळा लावून पाच इसमांना ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेतलेले व्यक्ती असे..

१) अभिमान वय २५ वर्षे, रा. तुपडी, ता. निलंगा.
२)धनंजय वय २८ वर्षे, रा. दगडवाडीत, लातूर.
३)बालाजी प्रशांत कांबळे, वय २२ वर्षे, रा. तुपडी, ता. निलंगा.
४)बालाजी वय ५४ वर्षे, रा. भातखेडा, लातूर.
५)सचिन वय २८ वर्षे, रा. मेघराज नगर, शाहू चौक, लातूर.

यांची झडती घेतली तेव्हा त्यांच्याकडे अंदाजे ४२ ग्रॅम खरे सोन्याचे दागिने, रोख रक्कम, डुप्लीकेट सोन्याचे बिस्कीट १६ नग, डुप्लीकेट अंगठ्या ०३ नग, टाटा इंडीगो कार ( २३ ९२२२), होंडा एक्टिवा स्कूटी ( २४ ९३०८) असा एकूण ९,०१,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तपासात पकडलेल्यांनी कबुली दिली आहे की, त्यांचे टोळीचा मुख्य सूत्रधार ६) संदीप वय अंदाजे २७ वर्षे, रा. सलगरा, ता. जि. लातूर, सध्या रा. जठाळ कॉलनी, लातूर (फरार) व सचिन हे सोनार व्यावसायिक असून ते डुप्लीकेट सोन्याचे बिस्कीट व दागिने तयार करून देत इतर आरोपी त्या डुप्लीकेट दागिन्यांचा वापर करून लोकांना ''खरे सोने स्वस्तात मिळत आहे'' किंवा ''रस्त्यावर पडलेले सोने आहे'' असे सांगून फसवणूक करीत. नागरिकांकडील खरे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घेऊन ती सर्व मालमत्ता संदीप कडे सुपूर्द केली जात असे.

अधिक दिलेल्या माहितीनुसार व पोलीस अभिलेख तपासणीअंती पोलीस ठाणे उदगीर शहर, औसा, देवणी, शिवाजीनगर, उदगीर ग्रामीण, चाकूर येथे भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३ (५) अन्वये दाखल गुन्ह्यांशी त्यांचा थेट संबंध आढळून आला आहे .तसेच नमूद टोळीने धाराशिव, नांदेड, परभणी जिल्ह्यातही डुप्लिकेट सोन्याचे बिस्किट देऊन फसवणूकचे गुन्हे केल्याचे कबूल केले आहेत.

पुढील कायदेशीर कारवाई करिता नमूद आरोपींना पोलीस ठाणे उदगीर शहर यांच्या ताब्यात देण्यात आले असून टोळीचा मुख्य सूत्रधार व टोळी प्रमुख फरार संदीप याचा पोलीस पथक शोध घेत असून त्याला नमूद गुन्ह्यात लवकरच अटक करण्यात येणार आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या विशेष पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उप निरीक्षक अमर केंद्रे, राजेश घाडगे, प्रमोद देशमुख, पोलीस अमलदार साहेबराव हाके, रियाज सौदागर, राजेश कंचे, मोहन सुरवसे, युवराज गिरी, मनोज खोसे, आनंद हल्लाळे, प्रवीण कोळसुरे, सिद्धेश्वर मदने, जमीर शेख, राहुल कांबळे, प्रदीप चोपणे, व्यंकटेश निटुरे, संतोष खांडेकर, शैलेश सुडे, महिला पोलीस अंमलदार सुरेखा मदने, अंजली गायकवाड यांनी केली आहे.

ही कारवाई लातूर जिल्ह्यातील नागरिकांसाठी दिलासा देणारी असून, फसवणूक व आर्थिक गुन्हे करणाऱ्या टोळ्यांविरुद्ध पोलीस प्रशासन सतर्क व कठोर असल्याचे उत्तम उदाहरण आहे. लातूर पोलीस नागरिकांना आवाहन करतात की, रस्त्यावर किंवा अनोळखी व्यक्तीकडून ''स्वस्तात सोने मिळते'' अशा आमिषाला बळी पडू नये.अनोळखी व्यक्तींशी आर्थिक व्यवहार करताना अत्यंत सावधगिरी बाळगावी. अशा संशयास्पद घटना आढळल्यास त्वरित नजीकच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा. लातूर पोलीस प्रशासन नागरिकांच्या सुरक्षेसाठी सदैव सज्ज असून, अशा प्रकारच्या संघटित गुन्हेगारीविरोधात भविष्यातही यापेक्षा अधिक कठोर व प्रभावी कारवाई करण्यात येणार आहे.

# भरत पवार हे प्राइड ऑफ यंग हिंदुस्तान राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**लातूर/प्रतिनिधीः** यंगिस्तान फाउंडेशन च्या वतीने पूर्ण भारतामध्ये दरवर्षी सामाजिक कार्यामध्ये योगदान देणाऱ्या युवकांना प्राईड ऑफ यंग हिंदुस्तान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संपूर्ण भारतातून १५ युवकांना हा पुरस्कार दिला. त्यामध्ये महाराष्ट्रातून भरत महादेव पवार रा .गव्हाण ता.रेणापूर जि.लातूर यांना हा पुरस्कार आहे. ९ ते ११ जानेवारी दरम्यान उल्हासनगर मुंबई येथे पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मेजर पवन कुमार थपलियाल यांनी सांगितले की, हा पुरस्कार केवळ एक ट्रॉफी किंवा प्रमाणपत्र नाही, तर समाजसेवकांच्या प्रति कृतज्ञता आणि प्रेरणा याचे प्रतीक आहे. यंगिस्तान फाउंडेशनचे संस्थापक मिथिलेश यांनी सांगितले की, त्यांचा उद्देश असे युवांना सम्मानित करणे आहे जे कोणत्याही स्वार्थाशिवाय समाजासाठी कार्य करतात या कार्यक्रमाला वेदांता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत शिंदे अनेक पदाधिकारी व विविध सेवाभावी संस्थाचे सदस्य व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

भरत पवारा यांनी गेल्या अनेक वर्षांपासून महाविद्यालयीन जीवनात उच्च शिक्षणाबरोबरच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व वैयक्तिक स्तरावर शैक्षणिक,सामाजिक व पर्यावरणीय क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केले आहेत. कोविड १९ आपत्तीच्या प्रसंगी त्यांच्या हातून रुग्णसेवा व मानव सेवा मोठ्या प्रमाणात घडली आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाच्या प्रवाहाच्या बाहेर असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवाहात आणून मोफत शिक्षण दिले. राष्ट्रीय शिक्षा अभियान,जलसुरक्षा अभियान ,एचआयव्ही जनजागृती अभियान, सडक सुरक्षा जीवन रक्षा, रक्तदान, पल्स पोलिओ मतदान जनजागृती अभियान, उन्नत भारत अभियान,पर्यावरण जनजागृती, शिक्षित भारत विकसित भारत अशा राष्ट्रीय उपयोगी व समाज उपयोगी कार्यात त्यांनी कार्य करून समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. विविध शासनाच्या योजनेची लोकांना माहिती देऊन लाभार्थ्यांना प्रत्यक्षात त्याचा लाभ मिळवून दिला.

त्याचबरोबर लघु शोध निबंधाच्या माध्यमातून समाजामधील आर्थिक सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकून समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न केले तसेच अनेक वृत्तपत्रात जागृती पर लेखही लिहिले.

एकंदरीत त्यांच्या या सर्व अनुकरणीय प्रशंसनीय व निस्वार्थ भावनेने केलेल्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना हा प्राईडऑफ यंग हिंदुस्तान राष्ट्रीय पुरस्कार २०२५-२६ हा बहुमान देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

भरत पवार यांच्या या उपलब्धी बाबत त्यांचे वडील महादेव विनायक पवार व आई सौ.सुरेखा महादेव पवार तसेच प्राचार्य,डॉ. सुदाम पवार, संभाजी पवार,संदिपान पवार,बळीराम पवार,नवनाथ सावंत बालाजी पवार,व्यंकटेश कीर्तन,सतीश कीर्तन इत्यादी नातेवाईक मित्रमंडळी व समस्त गव्हाण ग्रामस्थांनी भरतचे अभिनंदन व कौतुक केले आहे...

# दयानंद शिक्षण संस्था अद्ययावत सुविधांनी सुसज्ज - नांदेड उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक मा.बाबासाहेब भोसले

**लातूर/प्रतिनिधीः**महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या खुल्या गटाच्या निमंत्रित क्रिकेट स्पर्धेच्या निमित्ताने दयानंद शिक्षण संस्थेच्या क्रिकेट मैदानावर राज्यस्तरीय स्पर्धेसाठी लातूर जिल्हा निवड चाचणी सामने दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजीत करण्यात आले.सामन्यातील कामगिरीच्या आधारे लातूर जिल्हा क्रिकेट संघटनेचा संघ निवडला जाणार आहे.या सामन्याच्या प्रसंगी नांदेड उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक मा.बाबासाहेब भोसले यांनी भेट देऊन मैदानाची पाहणी केली तसेच सर्व खेळाडूंना मार्गदर्शन करून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

याचबरोबर दयानंद विज्ञान महाविद्यालयास उच्च शिक्षण सहसंचालक मा. बाबासाहेब भोसले व कॅश समितीने भेट देत असताना महाविद्यालयातील विविध अद्यावत शैक्षणिक सुविधा, ऑनलाईन लाइव्ह क्लासरूम, क्रिकेट ग्राउंड इत्यादीची पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व दयानंद शिक्षण संस्थेच्या उल्लेखनीय कार्याचा आढावा घेऊन दयानंद शिक्षण संस्था अद्ययावत शैक्षणिक सुविधांनी सुसज्ज आहे याबद्दल समाधान व्यक्त केले.याप्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ.भास्कर माने, प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ.संग्राम मोरे,प्रा.डॉ. महेश बेंबडे प्रा.डॉ.अशोक वाघमारे, प्रा.सौरभ जांभळे व खेळाडू उपस्थित होते.




# महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ अंतर्गत लातूर जिल्ह्यातील कुख्यात टोळीवर हद्दपारीची कडक कारवाई, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाचा निर्णय

**लातूर/प्रतिनिधीः** लातूर जिल्ह्यातील नागरिकांचे जीवन, मालमत्ता व सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन सदैव कटिबद्ध असून, समाजात दहशत निर्माण करणाऱ्या व सतत गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ च्या कलम ५५ अंतर्गत लातूर येथील एका कुख्यात टोळीविरुद्ध हद्दपारीचा आदेश पोलीस अधीक्षक, लातूर श्री. अमोल तांबे यांनी निर्गमित केला आहे.

हद्दपार करण्यात आलेले इसम पुढीलप्रमाणे आहेत

१) ईश्वर गजेंद्र कांबळे, वय २३ वर्षे, रा. जय नगर, लातूर.

२) विकास उर्फ विक्की गजेंद्र कांबळे, वय २५ वर्षे, रा. जय नगर, लातूर.

३) प्रफुल श्रीमंत गायकवाड, वय २९ वर्षे, रा. सिद्धार्थ सोसायटी, लातूर.

या तिन्ही इसमांविरुद्ध पोलीस स्टेशन विवेकानंद चौक, लातूर येथे जबरी चोरी, दरोडा, शस्त्राचा धाक दाखवून लूटमार, धमकी देणे, टोळी बनवून गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणे अशा स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यांचा गुन्हेगारी अभिलेख पाहता ते सातत्याने संघटित पद्धतीने गुन्हे करीत असून, त्यांच्या कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती, दहशत व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झालेले आहे.

या टोळीविरुद्ध यापूर्वी वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई (कलम १०७ सीआरपीसी, १२९ बीएनएसएस इ.) करण्यात आली होती. मात्र, या सर्व कारवायांनंतरही त्यांच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झालेली दिसून आली नाही. उलट त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांमध्ये सातत्य व तीव्रता वाढलेली आढळून आली. त्यामुळे हे स्पष्ट झाले की, सामान्य कायदेशीर कारवाया त्यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्यास अपुऱ्या ठरत आहेत. या टोळीविरुद्ध कोणीही उघडपणे तक्रार देण्यास धजावत नाही. कारण टोळीतील सदस्य तक्रारदारांना शारीरिक इजा, धमकी व मानसिक त्रास देतात. त्यामुळे नागरिक दहशतीखाली जीवन जगत असून, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था धोक्यात आलेली होती. त्यांनी कायद्याचा अवमान केल्याचे व त्यांना कायद्याची भीती नसल्याचे स्पष्ट होत होते. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांचे आदेशान्वये विवेकानंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील व त्यांच्या टीम मधील पोलीस अंमलदार खुर्रम काझी, गणेश यादव, रवी गोंदकर, रणवीर देशमुख, सचिन राठोड, यशपाल कांबळे, धैर्यशील मुळे यांनी नमूद आरोपी विरुद्ध हद्दपारचा सविस्तर प्रस्ताव तयार करून तो पोलीस अधीक्षक लातूर यांच्याकडे पाठवण्यात आला होता.

प्रस्तावा मधील सर्व बाबींचा विचार करता, पोलीस अधीक्षक, लातूर यांनी सदर टोळी व तिच्या सदस्यांकडून भविष्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडण्याची दाट शक्यता आहे. आगामी सण, उत्सव, निवडणुका व सार्वजनिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी त्यांना जिल्ह्याबाहेर हद्दपार करणे अत्यावश्यक असल्याने महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम ५५ अंतर्गत सदर तिन्ही इसमांना लातूर जिल्हा,नांदेड जिल्ह्यातील लोहा, मुखेड, देगलूर तालुके, धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, धाराशिव, उमरगा, कळंब तालुके, परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुका या सर्व हद्दीतून दोन वर्षांच्या कालावधीसाठी हद्दपार करण्यात आले आहे.

तसेच पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या पूर्वपरवानगीशिवाय हद्दपार क्षेत्रात प्रवेश करता येणार नाही. हद्दपारीच्या कालावधीत त्यांनी आपला निवासाचा पत्ता नजीकच्या पोलीस ठाण्यास कळविणे, दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी हजेरी देणे, तसेच न्यायालयीन कामासाठी येताना पूर्वपरवानगी घेणे आवश्यक करण्यात आले आहे.

समाजातील सामान्य नागरिकांना सुरक्षिततेची भावना देण्यासाठी, कायद्याची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी आणि गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा गुन्हेगारी कृत्ये, दहशत, धमकी, लूटमार व संघटित गुन्हेगारी यांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही. लातूर पोलीस नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सदैव सज्ज असून, समाजविघातक प्रवृत्तीविरुद्ध अशाच प्रकारची कठोर आणि प्रभावी कारवाई भविष्यातही सुरू राहील.

# मध्य रेल्वेने अतिविशिष्ट रेल सेवा पुरस्कार २०२५ मध्ये ५ शिल्ड्स जिंकणाऱ्या आपल्या पुरस्कारप्राप्त संघांचे स्वागत केले

**मुंबई /प्रतिनिधीः** ७०व्या अतिविशिष्ट रेल्वे सेवा पुरस्कार (एव्हीआरएसपी) सोहळा२०२५ मध्ये पाच विभागीय शिल्ड जिंकणाऱ्या आपल्या पुरस्कारप्राप्त संघाचा सन्मान करून मध्य रेल्वेने अभिमानाचा क्षण साजरा केला.

श्री विवेक कुमार गुप्ता, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, यांच्यासह प्रधान विभागप्रमुख (पीएचओडी) आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या टीमने १३ जानेवारी २०२६ रोजी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील ''चिंतन'' परिषद सभागृहात आयोजित विशेष समारंभात मध्य रेल्वेने जिंकलेल्या पाच शिल्ड सादर केल्या त्यावेळी उपस्थितांकडून प्रचंड टाळ्यांचा कडकडाट झाला.

नुकतेच ९ जानेवारी २०२६ रोजी यशोभूमी, द्वारका, नवी दिल्ली येथील इंडिया इंटरनॅशनल कन्व्हेन्शन अँड एक्स्पो सेंटर येथे आयोजित ७०व्या अति विशिष्ट रेल सेवा पुरस्कार (एव्हीआरएसपी) समारंभ २०२५ दरम्यान माननीय रेल्वेमंत्री श्री. अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते मध्य रेल्वेला हे सन्मान प्रदान करण्यात आले.

मध्य रेल्वेला प्राप्त झालेले शिल्ड्स पुढीलप्रमाणे आहेत:

* स्टोअर्स शिल्ड,
* पूल देखभाल शिल्ड,
* नागरी अभियांत्रिकी बांधकाम शिल्ड (पश्चिम रेल्वेसोबत संयुक्तपणे),
* नागरी अभियांत्रिकी शिल्ड (पश्चिम रेल्वेसोबत संयुक्तपणे) आणि
* सिग्नल कार्यक्षमता शिल्ड (उत्तर मध्य रेल्वेसोबत संयुक्तपणे).

या प्रसंगी बोलताना महाव्यवस्थापकांनी या उल्लेखनीय यशाचे श्रेय मध्य रेल्वेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समर्पित परिश्रम, संघभावना आणि अढळ बांधिलकीला दिले, ज्यामुळे संस्थेला उत्कृष्ट कार्यप्रदर्शन करत उल्लेखनीय यश संपादन करता आले.

हा प्रसंग संपूर्ण मध्य रेल्वे कुटुंबासाठी अभिमानाचा व प्रेरणादायी क्षण ठरला असून, उत्कृष्टता, नावीन्य आणि संघभावनेप्रती असलेली बांधिलकी अधिक दृढ झाली आहे. मध्य रेल्वे, कार्यक्षमतेत वाढ, सुरक्षा मानकांचा दर्जा उंचावणे आणि प्रवासी समाधान अधिकाधिक वाढवण्याच्या निर्धारावर ठाम असून, भारतीय रेल्वेच्या वाढी व आधुनिकीकरणात आपले महत्त्वपूर्ण योगदान पुढेही सुरू ठेवण्यास कटिबद्ध आहे.

# मुक्तांगण मध्ये मकर संक्रांती सण साजरा

**लातूर/प्रतिनिधीः** लातूर येथील विशाल नगर परिसरातील साई मंदिर समोरील मुक्तांगण इंग्लिश स्कुल मध्ये मोठया उत्साहात मकर संक्रांती सण साजरा केला.

यावेळी प्राचार्या सुमेरा शेख यांनी विठ्ठल रुक्मिणी आणि सरस्वती यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन केले.

या प्रसंगी शाळेच्या शिक्षिका प्रणिता सुरवसे यांनी मकर संक्रांती सणाची माहिती दिली. तिळगुळ घ्या गोड गोड बोला हा संदेश यादिवशी दिला जातो.

शाळेचे शिक्षक, शिक्षिका यांनी ऐकमेकांना तिळगुळ देऊन शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे विद्यार्थी व पालकांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्र संचलन शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# ग्रामपंचायत सदस्य संजय माने यांच्या वाढदिवसानिमित्त होर्टी येथे दिव्यांग विद्यार्थ्यांना ब्लँकेट वाटप

तुळजापूर (विजय पिसे)-तालुक्यातील जळकोट येथील ग्रामपंचायत सदस्य संजय माने यांनी होर्टी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्तिव्यंग निवासी विद्यालय या शाळेतील विद्यार्थ्यांसोबत केला वाढदिवस साजरा. कार्यक्रमाच्या प्रथम राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार विजय पिसे यांच्या हस्ते प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले.

आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो या हेतूने थंडीच्या दिवसात विद्यार्थ्यांना थंडीपासून त्रास होऊ नये या दृष्टिकोन ठेवून वाढदिवसाला होणारा वायफट खर्च टाळून होर्टी येथील अनाथ, दिव्यांग व मूकबधिर ५० विद्यार्थ्यांना या थंडीचे ब्लँकेट व अल्पउपहारचे वाटप करण्यात आले.

तसेच वृक्ष लागवड ही करण्यात आली. यावेळी जळकोट गावचे माजी सरपंच संजय माने , मा. सरपंच संजय अंगुले, पत्रकार विजय पिसे, पत्रकार मंगेश सुरवसे, अन्वर भाई शेख, प्रसाद हतै ,सदाशिव हासुरे, प्रशांत बिराजदार, राम गुरव, कलीम जमादार, विवेक राणा, स्वप्नील कदम, शुभम अंगुले, विवेक बिराजदार, विशाल राणा, विशाल पवार ,अमीर शेख ,लखन जाधव, अरबाज बागवान, मतीन बागवान शाळेचे मुख्याध्यापक सुरवसे सर, क्रीडा शिक्षण कणसे, शेख सर, गजधने सर, बिराजदार सर, कलगुडे सर, व तसेच इतर कर्मचारी व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युवा नेतृत्वातवर भर, विकासावर नजर, निवडणुकी आधीच विकासाची परीक्षा! अर्चनाताई पाटील यांची धडाकेबाज कार्यशैली



धाराशिव( रामेश्वर डोंगरे ) जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अर्चनाताई पाटील सध्या संपूर्ण जिल्ह्यात अॅक्शन मोड मध्ये दिसून येत आहेत, प्रत्येक गटातून जिल्हा परिषदेचे आणि गणातून पंचायत समितीचे उमेदवार ठरवताना केवळ नाव किंवा ओळखीवर नव्हे तर काम, जनसंपर्क आणि जनतेसाठीच तळमळ या निकषावर अर्चनाताई पाटील स्वतः काटेकोर चाचणी घेत आहेत. विशेष बाब म्हणजे, त्या फक्त उमेदवार निवडी पुरत्या मर्यादित न राहता गटनिहाय विकास कामाचा सखोल आढावा घेत आहेत. कुठली कामे सुरू आहेत. कुठली रखडली आहेत. निधी असूनही अडथळे का येत आहे. याची माहिती त्या स्वतः प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन घेत आहेत. जेथे विकास कामे थांबली आहेत तिथे त्या संबंधित अधिकारी, ठेकेदार आणि स्थानिक लोकप्रतिनिधीशी थेट संवाद साधून काम पूर्ण होण्याची अंतिम तारीख निश्चित करताना दिसून येत आहेत. पाठपुरावा स्वतःहून करत आहेत. अर्चनाताई पाटील यांची स्वतंत्र टीम संपूर्ण जिल्हाभर फिरून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवाराची कामे तपासत आहेत मात्र अंतिम निर्णय घेण्याआधी अर्चनाताई स्वतः त्या उमेदवाराचा जनतेशी असलेला संपर्क त्याच्या कामाची विश्वासहिता आणि समाजासाठीची निष्ठा जातीने पाहतात. नुसते पदासाठी इच्छुक नव्हे तर जनतेसाठी झटणारेच उमेदवार हवेत. ही त्यांची स्पष्ट भूमिका आहे. यावेळी त्यांच्या निर्णय प्रक्रियेत युवा उमेदवारांना विशेष प्राधान्य मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कारण युवा उमेदवारांमध्ये धडाडी, उर्जा, आधुनिक विचारसरणी आणि अहोरात्र काम करण्याची तयारी असल्याचा त्यांचा ठाम विश्वास आहे. यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये जिल्ह्याला नव्या दमाचे काम करणारे नेतृत्व मिळण्याची शक्यता बळकट झाली आहे. एकूणच पाहता अर्चनाताई पाटील या केवळ निवडणुकीच्या तयारीत नाहीत तर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकास हा केंद्रबिंदू ठेवून अहोरात्र कार्यरत आहेत. उमेदवार निवड असो वा रखडलेली विकास कामे पूर्ण करण्याचा पाठपुरावा प्रत्येक ठिकाणी त्यांची थेट उपस्थिती आणि निर्णय क्षमता जिल्ह्याच्या राजकारणात नवा विश्वास निर्माण करत आहेत. जनतेसाठी झटणारे नेतृत्व कसे असावे याचे जिवंत उदाहरण सध्या अर्चनाताई पाटील देताना दिसत आहेत.

# युवकांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विवेकानंद सप्ताहाचे आयोजन-डॉ.जयसिंगराव देशमुख



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करत असताना केवळ एक दिवस जयंती साजरी करून चालणार नाही तर युवकांच्या अंगी असलेले सुप्त गुण बाहेर पडावेत, त्यांच्या मध्ये असलेल्या गुणांना सादर करण्याची संधी मिळावी यासाठी १२ जानेवारी ते १९ जानेवारी हा विवेकानंद सप्ताह साजरा केला जातो असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मराठवाडा सहविभाग प्रमुख डॉ.जयसिंगराव देशमुख यांनी विवेकानंद सप्ताह उद्घाटन प्रसंगी केले.

संस्थेने केलेल्या नियोजनाप्रमाणे आणि घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून खेळीमेळीच्या वातावरणामध्ये या सप्ताहातील संपूर्ण स्पर्धा पार पाडाव्यात असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.

धाराशिव येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विवेकानंद सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटक म्हणून मराठवाडा सह विभाग प्रमुख डॉ. जयसिंगराव देशमुख हे लाभले होते. यावेळी त्यांनी वरील उद्गार काढले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख हे होते. डॉ. संदीप देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त करताना राजमाता जिजाऊ मासाहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विवेकानंद चव्हाण यांनी केले,सूत्रसंचालन डॉ.वैभव आगळे यांनी केले तर आभार डॉ.बालाजी गुंड यांनी मानले.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# ऊस व आंब्याची झाडे आग लावून जाळून केल नुकसान

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत भाउसाहेब, ज्ञानेश्वर दोघे रा. सोनारी ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.१२.०१.२०२६ रोजी २०.०० वा. सु.सोनारी शिवारातील शेत गट नं १२२ येथे फिर्यादी सदाशिव रामलिंग तोडकरी, वय ६० वर्षे, रा.सोनारी ता. परंडा जि. धाराशिव यांचे सोनारी शिवारातील शेत गट नं १२२ मधील साडे तीन एकर उस व अंब्याची झाडे असा एकुण १,२५,००० किंमतीचे ऊस व आंब्याची झाडे आग लावून जाळून नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- सदाशिव तोडकरी यांनी दि.१३.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे आंबी येथे गुन्हा नोंदवला आहे.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **BHARAT SHARADRAO NAIKANAWARE**
TO **BHARAT SHARADRAO NAIKNAWARE**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **BHARAT NAIKNAWARE** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **BHARAT SHARADRAO NAIKANAWARE.**
NEW NAME:- **BHARAT SHARADRAO NAIKNAWARE.**
Address :- DATT CHOWK,GANESH NAGAR, OSMANABAD. DIST. OSMANABAD - 413501
AADHAR NO.- 864461757716 Mob. No.-9175400612

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **NARWADE VIRAJ SANJAY**
TO **NARAVADE VIRAJ SANJAY**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **NARAVADE VIRAJ SANJAY** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **NARWADE VIRAJ SANJAY.**
NEW NAME:- **NARAVADE VIRAJ SANJAY.**
Address :- AT PIMPALA BK.,POST PIMPALA KHURD,TQ. TULJAPUR
DIST. OSMANABAD - 413623
AADHAR NO.- 857407811247 Mob. No.-8010512116


# खामसवाडीत शाळेच्या रस्त्यावर ६ सीसीटीव्ही

खामसवाडी (प्रतिनिधी)-कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्रशाला शाळेत पाचवी ते दहावीपर्यंत ४८० विद्यार्थी अध्यापन करत आहेत. जिल्हा परिषद शाळा गावापासून एक किलोमीटर असल्याने विद्यार्थी पायी जात असताना टवाळखोर यांचा त्रास होऊ लागल्याने तसेच अल्पवयीन मोटरसायकलस्वार आपली मोटार सायकल सुसाट वेगाने पळवत असून याचा विद्यार्थी व विद्यार्थिनींना याचा शाळेत जाताना त्रास होऊ लागला याची दखल घेत ग्रामपंचायत कार्यालय व लोकनियुक्त सरपंच अमोल पाटील यांच्या संकल्पनेतून आज गावातील साठे चौक शिवपूरवस्तीपर्यंत शाळेच्या रोडवर सोलारवरील सहा सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत, याची चपराक टवाळखोरांना व सुसाट वेगाने गाडी चालवणाऱ्यांना बसणार आहे. इतर ठिकाणी आणखी कॅमेरे बसवणार आहोत सध्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या. स्वनिधीमधून सहा सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. मुलींना संरक्षण मिळेल साठे चौक ते शिवपूर वस्तीपर्यंत सहा सीसीटीव्ही कॅमेरे बसवले असून, यामध्ये टवळखोरांना व सुसाट मोटरसायकलस्वारांना चपराक बसणार असून, मुलींना यापासून संरक्षण मिळणार आहे

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# खानापूर येथे रासेयो विभागामार्फत स्वच्छता अभियान

धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचालित के .टी.पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत युथ फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट विथ स्पेशल फोकस ऑन वॉटरशेड मॅनेजमेंट न्ड वेस्टलँड मॅनेजमेंट मौजे खानापूर येथे विशेष श्रम संस्कार शिबिर राबविण्यात येत आहे. या विशेष शिबिराच्या दुसऱ्या दिवशी गावामध्ये स्वच्छता करण्यात आली. ग्रामपंचायत व ग्रामपंचायतीचा परिसर, तलाठी कार्यालय व अंगणवाडी परिसर, हनुमान मंदिर परिसर, रेवणसिद्ध महाराज मठ, गावातील बस स्टॅन्डचा परिसर या भागांमध्ये स्वच्छता करण्यात आली.

तसेच दुपारच्या सत्रात के.टी.पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात श्री लक्ष्मण काकडे यांनी योग व ध्यान या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी सुदर्शन क्रियेबद्दल स्वयंसेवकांना सांगितले. सुदर्शन क्रिया ही शरीर, मन व भावनांचा समतोल राखण्यास मदत करते. तणाव, चिंता व नैराश्य कमी करते, आत्मविश्वास व सकारात्मकता वाढवते राग, भीती व तणाव कमी करते, भावनिक स्थैर्य प्राप्त होते, मन शांत ठेवते व एकाग्रता वाढवते, नकारात्मक विचारांवर नियंत्रण मिळवण्यास मदत करते.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. अतुलकुमार अलकुंटे, उपकार्यक्रमाधिकारी प्रा. शिवरत्न खरे, प्रा. पल्लवी हंगरगेकर, प्रा. प्रसाद मेनकुदळे व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिवम कॉम्प्युटर एज्युकेशन दिनदर्शिकेचे प्रकाशन उत्साहात



धाराशिव (प्रतिनिधी)-नळदुर्ग शहर व ग्रामीण भागात कंप्युटर- शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिवम कॉम्पुटर एज्युकेशनच्या सन २०२६ च्या वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज अप्पा धरणे व सर्व नगरसेवक आणि पत्रकार बांधव यांच्या हस्ते शहरातील मल्लिकार्जुन मंदिर येथे उत्साहात करण्यात आले.या सोहळ्याला मान्यवरांची उपस्थिती होती.

शहरातील व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासोबतच शाळा असो की महाविद्यालय, या डिजिटल युगात आत्मविश्वासाने वावरायचे असेल किंव्हा डिजिटल युगात धुमाकूळ घालत असलेल्या आर्टिफिशिअल इंटलीजन्स (-ख) सोबत जुळवून घेवून आत्मनिर्भर बनून जग जिंकायचे असेल तर कॉम्पुटरवर पकड असणे काळाची गरज बनली आहे,ही दिनदर्शिका विद्यार्थ्यांसाठी वर्षभर मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी बोलताना व्यक्त केला आणि शिवम कॉम्प्युटर संस्थेच्या भावी वाटचालीस व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

२०२६ ची दिनदर्शिका १२ संकल्पनात्मक मासिक पानांद्वारे विविध कॉम्प्युटर कोर्सेसची माहिती देण्यात आली आहे,जी मुलांच्या प्रगतीच्या प्रमुख स्तंभांचे दर्शन घडविते आणि बदलत्या युगाची प्रतिमा मांडते.यामध्ये आत्मनिर्भरतेकडून आत्मविश्वासाने विविध क्षेत्रांतील स्वावलंबनाचे बनून समृद्धी कडे वाटचाल करावी यासाठी जबाबदार व विश्वासार्ह उज्ज्वल भविष्याचा भागीदार म्हणून शिवम कॉम्प्युटर संस्थेतर्फे पाहिले जाते.

ही दिनदर्शिका आणि तिची समावेशकता प्रत्येक शाळकरी व महाविद्यालयीन पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांशी जोडण्याच्या शिवम कॉम्प्युटरच्या दृष्टीकोनाचे प्रतिबिंब आहे, असे शिवम कॉम्प्युटरचे सर्वेसर्वा तथा नळदुर्ग शहर व्यापारी महासंघांचे अध्यक्ष सतीश पुदाले यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला नगरपालिकेचे नगराध्यक्ष बसवराज धरणे, भाजपाचे नगरसेवक नय्यर जाहगीरदार, दत्तात्रय दास्कर, रिजवान काझी, ॲड.अरविंद बेडगे,तानाजी जाधव, इमाम शेख,करिम इनामदार,निरंजन राठोड, आबेदिन कुरेशी, मारुती खारवे, आकाश कुलकर्णी, नगरसेविका छमाबाई राठोड, राणी सुरवसे, साक्षी नळदुर्गकर,मन्नाबी कुरेशी, सुमनबाई ठाकूर, मिनाक्षी काळे आदी नगरसेवकांसह पत्रकार विलास येडगे, लतीफ शेख, विशाल डुकरे, उत्तम बनजगोळे,भगवंत सुरवसे, जहीर इनामदार, दादासाहेब बनसोडे,अयुब शेख, इरफान काझी,अजित चव्हाण आदिजन उपस्थित होते.

# कळंब येथे १९ जानेवारीला उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे विशेष शिबीर: नागरिकांसाठी मोठी सुविधा

धाराशिव (जिमाका)- नागरिकांच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजात सुलभता यावी,वेळ व खर्च वाचावा तसेच शासकीय सेवा थेट लोकांपर्यंत पोहोचाव्यात या उद्देशाने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय,धाराशिव यांच्या वतीने दरमहा तालुकास्तरीय शिबीर कार्यालयाचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमामुळे वाहन नोंदणी, परवाने,विविध अर्ज प्रक्रिया,दुरुस्ती व मार्गदर्शन यासाठी नागरिकांना जिल्हा मुख्यालयात जाण्याची गरज राहत नाही.

या अनुषंगाने जानेवारी २०२६ महिन्यातील वाढीव शिबीर कार्यालय तालुका कळंब येथे १९ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे.हे शिबीर त्या दिवशी नियोजित ठिकाणी तालुका कळंब येथे पार पडणार असून तालुक्यातील तसेच परिसरातील सर्व नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये वाहन चालक परवाना,वाहन नोंदणी,हस्तांतरण, दुरुस्ती,विविध प्रमाणपत्रे,शुल्क भरणे तसेच परिवहन विभागाशी संबंधित अडचणींचे निराकरण एका ठिकाणी करता येणार आहे.त्यामुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून कार्यालयीन कामासाठी होणारी धावपळ कमी होणार आहे.

तरी सर्व नागरिकांनी याची नोंद घेऊन दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी कळंब येथे आयोजित शिबीर कार्यालयाचा लाभ घ्यावा,असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय,धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले आहे.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग आणि टेलिकनेक्शनची कामे**

**निविदा सूचना क्रमांक. SUR-N-T-2025-26-36. दिनांक:-१३.०१.२०२६.** डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/ कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहे: **परिसरासह कामाचे नाव:** सोलापूर विभागातील ताजसुलतानपूर आणि धाराशिव स्थानकांवर मालधक्क्यांच्या विकासासंदर्भातील एस अँड टी ची कामे. **कामाची अंदाजित किंमत:** ७९,६४,९२७.१८/-. **निविदा अर्जाची किंमत:** शून्य. **जमा करावयाची अनामत रक्कम:** १,५९,३००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. **निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** ०४.०२.२०२६ रोजी १५.३० वाजल्यानंतर. तपशील **ireps** वेबसाइटवर उपलब्ध आहे. काही शुद्धिपत्रक/ दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ उपरोक्त ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष/टपाल/ई-मेल, फॅक्स, हाताने दिलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची **www.ireps.gov.in** वर नोंदणी करावी. अनामत रकमेचे (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी (म्हणजे निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाव्यतिरिक्त) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नामित अधिकाऱ्याकडे समक्ष सादर करावी लागेल. अधिक तपशिलांसाठी कृपया भेट द्या: **www.ireps.gov.in.**

डीआरएम-एस अँड टी शाखा,
मध्य रेल्वे, सोलापूर
Akar/Sur-5

रेल्वे मार्ग अनधिकृतपणे ओलांडणे हा शिक्षेस पात्र गुन्हा आहे



सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649